# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## वैद्यकीय मुख्य कार्यालय — धन्वंतरी कक्ष

## सभावृत्तांत

दिनांक — १०/११/२०२२ वेळ — दु.१२.३० वा.

विषय — धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीकडील विविध प्रलंबित विषयांचे अनुषंगाने बैठकीचा सभावृत्तांत..

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण - २०१३ नुसार समितीकडील विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करणेकामी गुरुवार, दि.१० नोव्हेंबर, २०२२ रोजी दु.१२.३० वा. मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्त यांचे दालनात बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.शेखर सिंह | आयुक्त तथा अध्यक्ष |
| २ | श्री.जितेंद्र वाघ | अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष |
| ३ | श्री.बबन झिंजुर्डे | अध्यक्ष पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष. |
| ४ | श्री.प्रमोद भोसले | मुख्य लेखापरिक्षक |
| ५ | श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी. |
| ६ | श्री.विठ्ठल जोशी | उपआयुक्त, सामान्य प्रशासन. |
| ७ | डॉ.लक्ष्मण गोफणे | सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ८ | डॉ.उज्वला अंदुरकर | वैद्यकिय उपअधिक्षक. वाय.सी.एम.एच. |
| ९ | श्री. प्रमोद जगताप. | कामगार कल्याण अधिकारी. |

समिती पुढील मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली —

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| १ | कर्मचा-यांसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना बंद करणे व त्याऐवजी वीमा योजना सुरू करणे याबाबत मे.न्यायालयात दावा दाखल आहे. त्यावर चर्चा करणे. | सदर विषयावार सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेणेत आले —<br>१. सदर दाव्याबाबत कायदा सल्लागार व कामगार कल्याण अधिकारी यांनी समन्वय |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | | साधुन उचित कार्यवाही त्वरीत करणेबाबत मा.आयुक्त सो यांनी सुचना दिल्या.<br>२. औद्योगिक न्यायालय, पुणे येथे दाखल असलेला खटला मागे घेणेबाबत अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी यथोचित कार्यवाही करावी.<br>३. पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ यांनी धन्वंतरी योजना चालू ठेवावी किंवा विमा योजना लागू करणेबाबत अधिकारी / कर्मचारी यांचेशी सल्लामसलत करुन त्वरीत आपले मत कळवावे<br>४.बैठकीमध्ये सादर केलेल्या आरोग्य विम्याच्या इतर मनपाच्या दिलेल्या माहितीनुसार बृहन्मुंबई मनपासारखे र.रु.१५,०००/- थेट लाभ हस्तांतर (DBT) करुन अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचा आरोग्य विमा काढावा हा पर्याय सुचविला.<br>५. सभासद संख्या, अपुरी मोठी रुग्णालये, रुग्णालयांची संख्या, खर्च, प्रलंबित बिल अदायगी, अपुरा कर्मचारी वर्ग इ.चा विचार करता विमा योजना कार्यान्वित करणे योग्य राहील असे मा.आयुक्त सो यांनी सुचविले.<br>६.अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी मनपा अधिकारी/ कर्मचारी यांचेशी सदर बाबात चर्चा करुन निर्णय देणेकामी १५ दिवसाचा अवधी मागितला त्यास मा.आयुक्तांनी संमती दिली. |
| २ | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक यांना धन्वंतरी योजनेत समाविष्ट करुन त्यांची वर्गणी र.रू.३००/- असणे आवश्यक आहे. व सेवानिवृत्त शिक्षक यांना धन्वंतरी आरोग्य योजना सुरू करणेबाबत | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक यांना नव्याने प्रस्तावित करणेत येणा-या विमा योजनेमध्ये समाविष्ट करणे शक्य होईल व त्यांस मनपाचे इतर अधिकारी / कर्मचारी यांप्रमाणे सभासद वर्गणी आकारणेत यावी. |
| ३ | श्री.काठे बंडू सुखदेव, लिफ्टमन मुख्य कार्यालय, विद्युत विभाग यांचे वडिल श्री.सुखदेव शंकर काठे | मंजूरी देणेत आली. |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | यांना CA SIGMOID COLON या आजारासाठी केमो थेरपी सुरू असून, बाहेरून खरेदी केलेली ओपीडी स्तरावरील औषधांचा झालेला खर्च र.रु.६२,१५६/- एवढा असून खर्चाची प्रतिपुर्ती करुन मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे. | |
| ४ | श्री.राजु किशनचंद चंदीरामानी, कार्यालय अधिक्षक पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग यांचे स्वत:चे यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया दि.२९/०१/२०१४ रोजी झालेली असून, शस्त्रक्रिया झालेनंतर तज्ञ डॉक्टरांचे सल्ल्यानुसार मासिक किंवा तिमाही वैद्यकिय तपासण्या कराव्या लागतात. सदरचा औषधोपचार खर्चिक असल्याने घरखर्चासह व इतर खर्चासह उपचार घेण्यास आर्थिक बोजा पडत असल्याने व सदरचे उपचार म.न.पा रुग्णालयात उपलब्ध नसल्याने नाईलाजास्तव खाजगी दवाखान्यात करावा लागत आहे. माहे १६/०५/२०१६ ते दि.२२/०९/२०२० पर्यंतचे औषधोपचार व तपासणी कामी बीले अनु.क्र.१ ते २४० र.रु.७,०७,४३८/- ची पूर्तता होणेकामी यापूर्वी अर्ज सादर केलेला होता. परंतु सदरची बीले ओ.पी.डी. स्वरूपाची असल्याने या बिलांची प्रतिपूर्ती करता येणार नाही असे कळविण्यात आले आहे. सदर बीले प्रतिपूर्ती कामी श्री,चंदीरामानी यांनी पुन्हा सादर केलेली आहेत. तसेच (ओपीडी स्वरूपातील) दि. ०६/०९/२०२१ ते दि.२२/१०/२०२१ पर्यंतचे औषधोपचार व तपासणीची बीले अनु.क्र.१ ते २६ र.रु.४९,३५५/-, दि.३१/१०/२०२१ ते दि.०३/०२/२०२२ पर्यंतचे औषधोपचार व तपासणीची बीले अनु.क्र.१ ते ११ र.रु.३४,३६१/- ची प्रतिपूर्ती होणेकामी अर्ज सादर केलेला आहे. व दि. २५/०२/२०२२ ते दि.१३/०७/२०२२ पर्यंतचे औषधोपचार व | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण – २०१३ अन्वये बाह्य स्वरुपातील (OPD) तपासण्यांची बिले देय नाहीत, परंतु श्री.चंदीरामानी यांना विषयांकीत कामी आलेल्या औषधोपचारांची बिले नियमानुसार देणेत मंजूरी देणेत आली. |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | तपासणीची बीले अनु.क्र.१ ते २० र.रु.४३,३५६/- ची प्रतीपूर्ती होणेकामी अर्ज सादर केलेला आहे. | |
| ५ | श्री.प्रकाश केरू घारमाळकर, सेवानिवृत्त हे धन्वंतरी योजनेचे सभासद आहेत. परंतु त्यांची मुलगी कु.आदिती प्रकाश घारमाळकर वय वर्षे १३ अल्पवयीन व अपंग असून आर्थिक दृष्ट्या संपूर्णत: त्यांचेवर अवलंबून असल्याने त्यांचे सेवानिवृत्ती पश्चात धन्वंतरी योजनेमध्ये तीचे नाव समाविष्ट करण्यास विनंती अर्ज सादर केलेला आहे. | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण — २०१३ मुद्दा क्र.३ आ नुसार कु.आदिती प्रकाश घारमाळकर यांचे कायमस्वरुपी अपंगत्वाचे प्रमाणपत्र ४०% पेक्षा जास्त असलेसबाबत तपासून पुढील कार्यवाही करणेबाबत निर्णय देणेत आला. |
| ६ | श्री.वाबळे विलावस बाबासाहेब, सेवानिवृत्त. सन २००५ नंतर नियुक्त आस्थापनेवरील सेवानिवृत्त कर्मचा-यांना धन्वंतरी स्वाथ्स्य योजनेचा लाभ मिळत नाही. अंशदान पेन्शन योजनेअंतर्गत निवृत्त कर्मचा-यांना देखील धन्वंतरी स्वास्थ्य योजना लागू करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. | अंशदान पेन्शन योजनेत समाविष्ट अधिकारी/ कर्मचा-यांना पेन्शन नसलेने सभासद वर्गणी कशा प्रकारे कपात करता येईल याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रस्ताव सादर करावा असा निर्णय घेणेत आला. |
| ७ | श्रीम.मंगल तुकाराम जाधव, क्रिडा शिक्षका हे धन्वंतरी योजनेचे सभासद आहेत. परंतु त्यांची मुलगी कु.अश्विनी तुकाराम जाधव वय वर्षे २६ अपंग असून आर्थिक दृष्ट्या संपूर्णत: त्यांचेवर अवलंबून असल्याने धन्वंतरी योजनेमध्ये तीचे नाव समाविष्ट करण्यास विनंती अर्ज सादर केलेला आहे. | मनपा अधिकारी / कर्मचारी यांचा पाल्य अपंग, मतिमंद असल्यास व तो पुर्णपणे सभासदावर अवलंबुन आहे व स्वत:ची उपजिविका करण्यास पुर्णपणे असमर्थ असल्यास अशावेळी सदर अपंग, मतिमंद बाबतचे ससून रुग्णालयाकडील प्रमाणपत्र आवश्यक राहील व त्यामध्ये शासकीय नियमानुसार ४०% पेक्षा जास्त असणे आवश्यक राहील. याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेनंतर कार्यवाही करावी. |
| ८ | श्री.पद्माकर चांगदेव बोरावके. वाहनचालक, अग्निशामक विभाग हे धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे सभासद आहेत. त्यांचा मुलगा कु.शुभम पद्माकर बोरावके वय २५ वर्षे हे विकलांग असल्याने त्याची संपूर्ण जबाबदारी ही श्री,पद्माकर बोरावके यांचेवर असल्याने धन्वंतरी योजनेमध्ये त्याचे नाव समाविष्ट करण्यास विनंती अर्ज सादर केलेला आहे. | मुद्दा क्र.७ प्रमाणे कार्यवाही करावी. |
| ९ | श्रीम.सुनंदा राजकुमार डोळस स.कामगार | मुद्दा क्र.७ प्रमाणे कार्यवाही करावी. |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | सं.क्र.९५७८ इ क्षेत्रिय कार्यालय ह्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेच्या सभासद आहेत. त्यांचा मुलगा कु.अक्षय राजकुमार डोळस वय २६ वर्षे हे दिव्यांग असल्याने त्याची संपूर्ण जबाबदारी ही श्रीम,सुनंदा डोळस यांचेवर असल्याने धन्वंतरी योजनेमध्ये त्यांचे मुलाचे नाव समाविष्ट करण्यास विनंती अर्ज सादर केलेला आहे. | |
| १० | मा.अँड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे, सभापती स्थायी समिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचेकडिल पत्रान्वये पिंपरी चिंचवड पत्रकार संघ, पिंपरी चिंचवड सोशल मिडिया परिषद व पिंपरी चिंचवड श्रमिक पत्रकार संघ यांना पिंपरी चिंचवड महापालिकेची धन्वंतरी व तत्सम आरोग्य विमा योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात कार्यरत असणा-या दैनिक, साप्ताहिक, इलेक्ट्रॉनिक्स माध्यम, न्युज पोर्टल, न्युज यूट्यूबच्या पत्रकार छायाचित्रकार व व्हिडीओग्राफर यांना व त्यांच्यावर अवलंबून असणा-या कुटुंब सदस्यांना लागू करणेबाबत विनंती केलेली आहे. | सदरचा विषय नामंजूर करणेत येत आहे. |
| ११ | श्री,जाधव कैलास शिवराम,रखवालदार सुरक्षा विभाग यांचा मुलगा कु.किरण कैलास जाधव वय २८ वर्ष मतिमंद असून, त्याचे नाव धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत समाविष्ट करून, योजनेचा लाभ मिळावा याबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. | मुद्दा क्र.७ प्रमाणे कार्यवाही करावी. |
| १२ | श्री.रामंजनेयुलू हनुमंता पडगीळ एक्सरे टेक्निशियन वाय सी एम हॉस्पिटल यांची पत्नी श्रीम,प्रमिला रामंजनेयुलू पडगीळ यांना Chronic Myeloid Leukemia या आजाराचे निदान झालेले असल्याने सदर आजार निदानानंतर पुढील सहा महीने कालावधीकरीता औषधोपचार घेणे गरजेचे असल्याने यावर होणा-या औषधोपचार खर्चाची प्रतीपूर्ती करून मिळणेबाबत अर्ज सादर केलेला | मंजूरी देणेत आली. |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | आहे. | |
| १३ | श्री.आर डी गायकवाड सेवानिवृत्त यांनी त्यांचे पत्नीस धन्वंतरी पॅनेलचे AIMS हॉस्पिटल,औंध पुणे येथे वैद्यकिय उपचारार्थ दि.२६/०१/२०२१ ते दि.०१/०२/२०२१ अखेर दाखल करण्यात आले होते. सदर ऍडमिट कालावधीत श्री,गायकवाड यांनी बाहेरून काही औषधे खरेदी केलेली आहेत व त्या औषधांच्या पावत्यांनुसार धन्वंतरी कक्षाकडे प्रतीपूर्तीकामी सादर केली असता, सदर औषधे ही अँडमिट कालावधीतील असल्याने एकाच कालावधीतील दोन बीले (हॉस्पिटलचे बील व प्रतिपूर्तीचे बील) मंजूर करता येत नसलेबाबत कळविणेत आले आहे. | सदरचा विषय नामंजूर करणेत आला. |
| १४ | कर्मचारी महासंघातील २ प्रतिनिधी नावे धन्वंतरी कमिटी सदस्य असल्याने कर्मचारी महासंघाकडून नावे सूचविण्यात यावीत. व एक महिला प्रशासन अधिकारी धन्वंतरी समिती सदस्य असल्याने त्यांचे नाव प्रशासन विभागाकडून सुचविण्यात यावे. | कर्मचारी महासंघ २ सदस्य नेमणूकीसाठी कर्मचारी महासंघास व एक महिला प्रशासन अधिकारी नेमणूकीस सामान्य प्रशासन विभागास पत्र देणेबाबत मान्यता देणेत आली. |
| १५ | प्रलंबित बिले त्वरीत निकाली काढणेबाबत दि.२०/०८/२०२१ रोजीच्या धन्वंतरी स्वास्थ्य समितीच्या मिटींगमध्ये ठरल्याप्रमाणे प्रशासन विभागाकडून २ लिपिक व २ उपलेखापाल उपलब्ध करून देण्याबाबत मागणीनुसार दि.२४/०९/२०२१ रोजी प्रशासन विभागास पत्र देण्यात आले होते, तथापि अद्यापपर्यंत कर्मचारी उपलब्ध झालेले नाहीत | सदर विषयाचे अनुषंगाने उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांना मा.आयुक्त सो यांनी २ लिपिक व २ उपलेखापाल त्वरित उपलब्ध करुन देणेकामी सुचना दिल्या. |
| १६ | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ चे धर्तीवर | विमा कंपनीकडून आलेल्या पत्राच्या अनुषंगाने |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | मनपा सेवेतील व सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांना विमा योजना लागू करणेकामी मनपा कडून दि.न्यू इंडिया एशुरन्स कं.लि. यांना र.रू.६,८१,५०,०००/- (र.रू.सहा कोटी एक्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) देण्यात आलेली होती. दि.न्यू इंडिया एशुरन्स कं.लि यांचे दि.१४/१०/२०२२ रोजीचा मेल प्राप्त झालेला आहे. त्यात नमुद केलेनुसार कोणत्याही कारणास्तव जारी केलेली पॉलिसी मिळवू शकत नसाल, तर मनपा चे बँक तपशिल द्यावेत जेथे रक्कम जमा करता येईल. | विमा कंपनीला अदा केलेली रक्कम परत मिळणेकामी पत्र देवून रक्कम परत मिळणेकामी पाठपुरावा करणेकामी मा.आयुक्त सो यांनी सुचना दिल्या. |
| १७ | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ अंतर्गत सन २०२१-२२ करीता माहे एप्रिल २०२१ ते माहे मार्च २०२२ अखेर एकूण खर्च र.रू.१६,९०,६०,४३०/- व सन २०२२-२३ करीता दि.०१ एप्रिल २०२२ ते दि.०९ नोव्हेंबर २०२२ अखेर एकूण खर्च र.रू.१७,५०,५५,५८३/- अवलोकनार्थ | मंजूरी देणेत आली. |
| १८ | मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित झालेले विषय —<br><br>१.प्रलंबित बिलांची अदायगी | विभागाने प्रस्तावित वाढ/घट र.रु.१० कोटी वर्गीकरणाबाबत लेखा विभागामार्फत आदेश निर्गत करणेत येवून व सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रलंबित बिल अदायगीकामी कर्मचारी उपलब्ध करुन देणेत यावेत.<br>मा.आयुक्त सो यांनी माहे-मार्च-२०२२ पर्यंची बिले प्रथम प्राध्यान्याने अदा करणेबाबत सुचना दिल्या. |
| | २.दंतोपचाराबाबत | सध्या चालू असलेल्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमधे दंतोपचाराची सुविधा उपलब्ध नाही, याबाबत दंतोपचार तज्ञ वाय.सी.एम.रुगणालय यांचेकडून दंतोपचारा मध्ये कोणते उपचारांचा |

| विषय क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| | | समावेश करता येईल याबाबत धोरण ठरविणेत यावे असे मा.आयुक्त यांनी सुचना दिल्या. |
| | ३.दुर्धर आजारांवरील औषधोपचारांची प्रतिपुर्ती करणेबाबत | ज्या आजारांचा समावेश दुर्धर आजारांमध्ये होतो त्यासाठी लागणा-या औषधांच्या बिलांची प्रतिपुर्ती धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत करुन देणेत यावी. |

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

18/11/22

सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी
वैद्यकीय विभाग प्रमुख

वैद्यकीय उप अधिक्षक
वाय.सी.एम.रुग्णालय

अध्यक्ष
पिंपरी चिंचवड कर्मचारी कर्मचारी महासंघ

कामगार कल्याण अधिकारी
कामगार कल्याण विभाग

उपआयुक्त
सामान्य प्रशासन विभाग

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
लेखा विभाग

मुख्य लेखापरिक्षक
मुख्य लेखापरिक्षण विभाग

अतिरिक्त आयुक्त -२
तथा उपाध्यक्ष

आयुक्त तथा अध्यक्ष